| MHST140023652022 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | २८.०९.२०२२ |
| | नोंद तारीख | : | ०४.१०.२०२२ |
| | निकाल तारीख | : | ०३.०१.२०२५ |
| | कालावधी | : | वर्ष– महिने– दिवस |
| | | | ०२– ०३– ०६ |

**फलटण येथील ४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी श्री.पी.एच.पाटील)

**फौजदारी कि.अर्ज क्र. ५३३/२०२२**

**नि.– ३३**

**सौ. सुलोचना मल्हारी शेलार.**
**वय–** ५३ वर्षे, **धंदा–** घरकाम,
**रा.** संतोषीमाता मंदीर रोड मलठण,
फलटण, ता. फलटण, जि. सातारा. } **अर्जदार**

**विरुध्द**

**श्री. मल्हारी नारायण शेलार.**
**वय–** ५७ वर्षे, **धंदा–** शेती,
**रा.** विडणी, ता. फलटण, जि. सातारा,
सध्या रा. जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे,
झारगवाडी, ता. बारामती, जि. पुणे. } **जाबदार**

---------------------------

अर्ज फौ.प्र.सं.कलम १२७ प्रमाणे

---------------------------

**विधीज्ञः–**

अर्जदारतर्फेः– श्री. एस. एस. भोसले.

जाबदारतर्फेः– श्री. व्ही. पी. जाधव.

## न्यायनिर्णय

(घोषीत ता. ०३.०१.२०२५)

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२७ अन्वये वाढीव पोटगीसाठी दाखल केला आहे.

### अर्जदाराचे अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे–

२. अर्जदार ही जाबदाराची पत्नी असून अर्जदार हिचा कौटुंबिक छळ करून जाबदार याने तिचा त्याग केलेने अर्जदार हिने जाबदार विरुध्द या मे. कोर्टात फौ.प्र.सं.कलम १२५ अन्वये फौ.कि.अर्ज.नं. १७३/१९८९ दाखल केला असून त्याचा निकाल दि. १६.०२.१९९० रोजी झालेला आहे. सदर निकालामध्ये अर्जदार हिस जाबदार यांचेकडून सदरील अर्ज दाखल तारखेपासून पोटगी म्हणून दरमहा र.रु. १००/– मंजूर केलेले आहेत.

३. अर्जदार हिचे असेही म्हणणे आहे की, सध्या जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडलेले आहेत. अर्जदाराचे रोजचे चरितार्थासाठी दैनंदीन खर्च, औषधपाणी यासाठी अर्जदारास मे. न्यायालयाने मंजूर केलेली पोटगीची रक्कम ही आजचे दैनंदीन जीवनाचा विचार करता अपूरी पडणारी अशी आहे. आजच्या महागाईतील वाढत्या दैनंदीन खर्चाचा व जीवनावश्यक वस्तूंच्या खर्चाचा विचार करता अर्जदार हिस त्यांचे दैनंदीन जीवनासाठी, चरितार्थासाठी दरमहा प्रत्येकी र.रु. १५,०००/– ची आवश्यकता

असून तेवढी पोटगी देणेची जाबदाराची ऐपत आहे. जाबदार यांची पिठाची गिरण असून त्यापासून त्यास दरमहा र.रु. १०,०००/– एवढे उत्पन्न मिळते. तसेच, जाबदार याची सुमारे १० आर बागायत शेती आहे. तसेच, जाबदार हा बांधकामाचे ठेकेदारीने काम करीत असून जाबदार यास सदर व्यवसायातून व शेती व्यवसायातून दरमहा जवळपास रु. ७०,०००/– ते रु. ८०,०००/– मिळतात. त्यामुळे जाबदाराची अर्जदार यांना दरमहा प्रत्येकी र.रु. १५,०००/– वाढीव पोटगी देणेची ऐपत आहे.

४. अर्जदार यांना स्वतःचे असे कसलेही उत्पन्नाचे साधन नसलेने अर्जदार स्वतःचा सांभाळ करणेस व चरितार्थ चालविणेस असमर्थ आहे. तसेच, अर्जदारास मुळ पोटगी अर्जात मंजूर केलेली पोटगी रक्कम याचा विचार करता यातून अर्जदाराच्या मुलभूत गरजा व चरितार्थचा खर्च, दवाखान्याचा खर्च पूर्ण होत नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांना जाबदाराकडून वाढीव पोटगी दरमहा प्रत्येकी र.रु. १५,०००/– मिळावी अशी विनंती केली आहे.

५. जाबदार यांनी याकामी हजर होवून त्यांचे म्हणणे नि.२१ वर दाखल केले आहे. जाबदार यांचे कथन की, अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज व त्यामधील मजकूर हा संपूर्णपणे खोटा, लबाडीचा व बनावट असून तो जाबदारास मुळीच मान्य व कबुल नाही. अर्जदार ही जाबदारांची पत्नी नाही, त्यामुळे जाबदार हे अर्जदार हिस पोटगी देणे लागत नाही. त्यामुळे वाढीव पोटगी देणेचा कोणताच प्रश्न उपस्थित होत नाही. अर्जदार हिने दाखल केलेल्या मुळ पोटगी अर्जात देखील जाबदार यांनी सदरील बचाव घेतलेला होता. परंतु, जाबदार यांचेकडे त्याबाबत त्यावेळी कोणताही ठोस पुरावा मिळून आलेला नसलेमुळे जाबदार हे त्यांचा बचाव शाबीत करू शकले नाहीत. अर्जदारानी दाखल केलेले कलम नं.१, २ व ३ मधील संपूर्ण कथन खोटे, लबाडीचे असून ते जाबदारांनी मुळीच मान्य व कबूल नसल्याचे जाबदारानी कथन केले आहे. या कारणास्तव अर्जदार यांचा अर्ज फेटाळून लावणेत यावा अशी विनंती जाबदार यांनी केलेली आहे.

६. जाबदार यांचे असेही म्हणणे आहे की, जाबदार हे ६० वर्षाचे झालेले आहेत. जाबदार हे वयोवृद्ध झालेले असलेमुळे त्यांना कोणताही कामधंदा होत नाही. जाबदार यांचेकडे शेतजमीन आहे. त्यामुळे त्यापासून दरमहा र.रु. ७०,०००/– ते रु. ८०,०००/– उत्पन्न मिळते ही बाब खोटी व लबाडीची आहे. जाबदार यांचे नावे १० गुंठे शेती आहे व त्यापासून दरमहा रु. ८०,०००/– उत्पन्न मिळते ही बाब अर्जदारी यांनी सक्तरित्या शाबीत करावी. ती शाबीत करणेची जबाबदारी (burden of proof) अर्जदारी यांचीच आहे. जाबदार यांचेकडे पिठाची गिरणी देखील नाही. त्यामुळे त्यापासून दरमहा रु. १०,०००/– उत्पन्न मिळणेचा कोणताच प्रश्न निर्माण होत नाही. जाबदार यांचे नावे गिरणी आहे व त्यापासून दरमहा रु. १०,०००/– उत्पन्न मिळते ही बाब अर्जदार यांनी सक्तरित्या शाबीत करावी. ती शाबीत करणेची कायदेशीर जबाबदारी (burden of proof) अर्जदार यांचीच आहे. अर्जदार ही शारिरीकदृष्ट्या सक्षम असून ती रोजंदारीने शेतात काम करते. तसेच, अर्जदार यांचेकडे १ दुभती गाय आहे. या सर्व बाबींपासून अर्जदार हिस दरमहा र.रु. २०,०००/– इतके उत्पन्न मिळते. अर्जदार हिचेवर तिचेशिवाय दुसरे कोणीही अवलंबून नाही. अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करू शकते. अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन आहे. जाबदार हे त्यांचे वयोमान झालेले असलेमुळे ते सारखेच आजारी असतात. त्यांना बी.पी., शुगर, दमा यासारखे गंभीर आजार आहेत. त्यामुळे त्यांना दवाखाण्यासाठी दरमहा बराच खर्च देखील करावा लागत आहे. सदरील खर्च हा जाबदार हे त्यांचे नातेवाईक व ओळखीचे इसमांपासून उधार घेवून करीत आहेत. त्यामुळे वाढीव पोटगी देणेची जाबदार यांची ऐपत नाही. सबब या सर्व कारणास्तव अर्जदार यांचा अर्ज फेटाळून लावणेत यावा अशी विनंती जाबदार यांनी केली आहे.

७. अर्जदारचा अर्ज पाहता खालील मुद्दे माझे विचाराधीन निघतात व त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंद केलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार ही शाबीत करते काय की, दि.१६.०२.१९९० च्या आदेशानंतर परिस्थितीमध्ये बदल झाला आहे? | होय. |
| २ | पुर्वीच्या पोटगी रक्कमेत वाढ करण्यात आली आहे काय? असल्यास किती? | होय, रक्कम रु.३०००/- |
| ३ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

८. अर्जदार हिने प्रस्तुत अर्जाकामी पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.११ दाखल केले असून प्रस्तुत अर्जाच्या पृष्ट्यर्थ फौ.कि.अर्ज (मुळ पोटगी अर्ज) क्र. १७३/१९८९ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. अर्जदाराने नि.१४ नुसार पुरावा संपल्याची पुरसीस दाखल केली आहे. जाबदेणार याने प्रस्तुत अर्जाच्या पृष्ट्यर्थ प्रतिज्ञापत्र नि.२७ दाखल केले असून प्रस्तुत अर्जाच्या पृष्ट्यर्थ रे.मु.नं. ५/२०२४ ची नि.१ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. जाबदेणार याने नि.२९ अन्वये पुरावा बंद केल्याची पुरसीस दाखल केली आहे.

**मुद्दा क्र. १ व २ बाबत:**

९. अर्जदार व जाबदेणार यांचे परस्पर विरोधी कथने पाहिली असता प्रस्तुतचा अर्ज फौ.प्र.सं.कलम १२७ नुसार पुर्वी मंजुर झालेली पोटगी रक्कमेत बदल करुन ती रक्कम वाढुन मिळावी अशी अर्जदाराची विनंती आहे. त्यानुसार विचार केला असता कलम १२७ नुसार पुर्वीच्या परिस्थितीमध्ये आता बदल झाले आहेत व त्याप्रमाणे पोटगी रक्कमेत वाढ करणे आवश्यक आहे. ही परिस्थिती समोर येणे गरजेचे आहे. यापुर्वी फौ.किरकोळ अर्ज क्र. १७३/१९८९ मध्ये न्यायालयाने दि. १६.०२.१९९० रोजीच्या

आदेशान्वये अर्जदार हिला दरमहा रु. १००/– पोटगी मंजूर केली होती. याबाबत उभय पक्षकरात वाद नाहीत. अशा परिस्थितीत हे पाहणे आवश्यक आहे की दि. १६.०२.१९९० नंतर परिस्थितीमध्ये बदल झालेला आहे किंवा कसे?

**१०.** अर्जदार व जाबदेणार यांचा पुरावा पहिला असता अर्जदार ही जाबदेणारची दुसरी पत्नी असल्याबाबत तोंडी पुराव्याव्यतिरिक्त कोणताही कागदोपत्री पुरावा जाबदेणार याने दाखल केला नाही. याशिवाय, जाबदेणार याने फौ.कि.अर्ज १७३/१९८९ मधील निकाल हा आजतागायत आव्हानित केलेला नाही त्यामुळे आता केवळ हे पाहणे आवश्यक आहे की, दि. १६.०२.१९९० नंतर परिस्थितीमध्ये बदल झालेला आहे किंवा नाही. जाबदेणार याच्याकडे पिठाची गिरणी असून त्यास दरमहा रु. १५,०००/– उत्पन्न मिळते शिवाय जाबदेणार याची बागायती शेतजमीन आहे व जाबदेणार हा बांधकाम ठेकेदारीचा व्यवसाय करतो व त्यापासून त्यास रु. ७०,०००/– ते रु. ८०,०००/– उत्पन्न मिळते याबाबत अर्जदाराने तोंडी पुराव्याव्यतिरिक्त कुठलाही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. जाबदेणार याने १९९० नंतर जिवनावश्यक वस्तूचे दर वाढलेले आहेत ही बाब मान्य केलेली आहे. याशिवाय, जाबदेणार याने अर्जदार ही कमवती असून रोजंदारीपासून दरमहा रु. २०,०००/– कमविते याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

**११.** गेल्या २० ते २५ वर्षात अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम झालेली आहे अशी परिस्थिती जाबदेणार याने न्यायालयासमोर आणलेली नाही. याशिवाय अर्जदाराची माहेरीची परिस्थिती चांगली आहे याबाबत जाबदेणारने कोणताही पुरावा समोर आणलेला नाही. पोटगी आदेश दि. १६.०२.१९९० रोजीचे आदेशानतर परिस्थितीमध्ये झालेला बदल याबाबत विचार केला असता प्रस्तुतचा अर्ज हा दि. २८.०२.२०२२ रोजी दाखल केला आहे. म्हणजेच पोटगीचा आदेश झालेनंतर सुमारे ३२ वर्षानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. या ३२ वर्षाच्या काळात

साहजिकच जिवनावश्यक वस्तुंचे दरात मोठी वाढ झाली आहे. १९९० रोजीची जिवनावश्यक वस्तूंचे दर व आजचे परिस्थिती विचारात घेतली असता एका व्यक्तीच्या उदरनिर्वाहासाठी दरमहा १००/– रु. रक्कम ही तुटपुंजी आहे अशा परिस्थितीत अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा अर्ज दाखल तारेखपासून मंजुर करावा म्हणुन विनंती केली आहे. अर्जदारचे विधीज्ञांनी मा. सर्वोच्य न्यायालय यांनी रजनीश वि. नेहा (२०२१) १ एससीसी (क्रिमिनल) ७४९ या खटल्याचा आधार घेतला. मा. सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त न्यायनिवाडयाचे अवलोकन केले असता पोटगीची रक्कम ही अर्ज दाखल तारखेपासुन किंवा अर्ज निकाल लागलेचे तारखेपासुन देणेसंबंधी दुरदृष्टी Discretion दिलेले आहे. अर्जदार हिने जाबदेणारविरुध्द पोटगी रक्कम वसूल होवून मिळण्यासाठी याच न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत प्रस्तुतचा अर्ज हा अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन देणेऐवजी आजचे तारखेपासुन देणे योग्य होईल. जाबदेणार याचे आजचे वय पाहता तो कमविण्यास सक्षम आहे याबाबत साशंकता निर्माण होते परंतु, अर्जदार हिला पोटगी देण्याची त्याची नैतिक जबाबदारी आहे हे नाकरता येणार नाही. त्यामुळे अर्जदाराची आजची परिस्थिती विचारात घेता अर्जदार ही दरमहा रक्कम रु.३०००/– पोटगी मिळणेस पात्र ठरते. म्हणून मी वादप्रश्न क्र.१ व २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न ३ करीता:</u>**

१२. यापूर्वी केलेल्या चर्चेचे अनुषंगाने मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | अर्जदार हिचा अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो. |
| २. | जाबदाराने अर्जदार हिस दरमहा वाढीव पोटगी रू.३०००/–(रक्कम रु. तीन हजार मात्र) सदर आदेशाचे तारखेपासून म्हणजेच दि. ०३.०१.२०२५ |

| | |
|---|---|
| | रोजीपासून देणेचे आहे. |
| ३. | या अर्जाच्या खर्चाबद्दल जाबदाराने अर्जदार हिस रू.१०००/– (रूपये एक हजार मात्र) द्यावे. |
| ४. | या आदेशाची एक साक्षांकित प्रत अर्जदार हिस निःशुल्क द्यावी. |

PANKAJ HILAL PATIL

Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
DN: cn=PANKAJ HILAL PATIL, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950436, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.01.03 15:45:59 +0530

**फलटण.** **(श्री. पी. एच. पाटील)**

**दि.– ०३.०१.२०२५.** **४ थे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण.**

# CERTIFICATE

I certify that, the contents of this PDF File are word to word as per Original Order.

| | | |
|---|---|---|
| **Name of Stenographer** | : | Shri. S. S. Awati. |
| **Name of the Court** | : | $4^{th}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Phaltan. |
| **Signed by Presiding Officer** | : | 03.01.2025 |
| **PDF uploading date** | : | 03.01.2025 |